परिव्यय व उर्जा लेखापरीक्षणासाठी
अर्हताधारक लेखापरीक्षकांची नामतालिका
तयार करणेबाबत.

**साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**जा.क्र./साआ/लेखापरीक्षण/परिपत्रक/नामतालिका/४४०९ / २०१९**
**दिनांक - १४ /०२/२०१९**

## -: परिपत्रक :-

१/- साखर कारखान्यांनी उत्पादीत होणा-या साखरेचे व इतर उपपदार्थांचे उत्पादन मूल्य कमीत कमी ठेवणे आवश्यक आहे. उत्पादन व वितरण खर्च मर्यादीत ठेवल्याने ऊस उत्पादक शेतक-यांना जास्तीत जास्त दर देणे साखर कारखान्यांना शक्य होते. यासाठी साखर कारखान्यांकडुन साखरेसह अन्य उपपदार्थांच्या उत्पादनांचे मूल्य परीक्षण होणे आणि ते मुल्य कमीत कमी राखणेबाबत उपाय योजना करणे यासाठी परिव्यय लेखापरीक्षण प्रती वर्षी करणे आवश्यक आहे, ज्यामुळे कारखान्याच्या आर्थिक सक्षमता वाढीस चालना मिळेल.

२/- साखर कारखान्यांच्या दैनंदिन कामकाजामध्ये विविध प्रकारच्या उर्जेचा व इंधनाचा उत्पादन प्रक्रीयेमध्ये मोठया प्रमाणावर वापर करण्यात येतो. या प्रक्रीयेमध्ये विविध उर्जा व इंधनांचा वापर कमीत कमी ठेवल्यास त्या पासून होणारी बचत साखर कारखान्यांना आर्थिकदृष्टया फायदेशीर ठरते. उत्पादन प्रक्रीये दरम्यान इंधनाची व उर्जेची होणारी गळती आणि अनावश्यक वापर टाळण्याकरीता उर्जा लेखापरीक्षणादरम्यान प्रभावी उपाय योजना संबंधित कारखान्यांचे निदर्शनास आणून देता येतात. उर्जा व इंधनावर होणा-या खर्चामध्ये बचत केल्याने उत्पादन खर्च कमी होवून त्याचा फायदा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना जास्तीचा दर देण्याकरीता होतो. शिवाय अशा नियमीत बचतीमुळे साखर कारखान्यांची आर्थिक स्थिती देखील सुदृढ राहते.

३/- महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या अधिनियमातील कलम ८१ (२)(अ) व ८१ (२)(ब) अन्वये सुयोग्य व्यापारी तत्वे व योग्य वाणिज्यीक प्रथा यांना अनुसरुन व्यवस्थापन होण्यासाठी परिव्यय लेखापरीक्षण अर्हताधारक परिव्यय लेखापालाकडुन करुन घेण्याची तरतुद आहे. तदनुषंगाने राज्य शासनाने दिनांक ०८/१२/२०११ रोजी परिव्यय लेखापरीक्षा व उर्जेच्या सुयोग्य विनीयोगासाठी उर्जा लेखापरीक्षा, प्रती वर्षी करुन घेणे बाबत वैधानिक निर्देश दिलेले आहेत. सदरहु मुलभूत बाबी पाहता साखर कारखान्यांनी त्यांच्या लेख्यांचे परिव्यय लेखापरीक्षण व उर्जा लेखापरीक्षण प्रती वर्षी करुन घेणे अनिवार्य झालेले आहे.

४/- महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांचे परिव्यय व उर्जा लेखापरीक्षण करण्यासाठी या पूर्वी या कार्यालयाद्वारे अनुक्रमे दिनांक १६/०१/२०१७ व दिनांक २१/१२/२०१६ रोजी सन २०१६-१७ ते सन २०१८-१९ या तीन वर्षांच्या कालावधीसाठी अर्हतेचे निकष निश्चित करुन त्याप्रमाणे अर्हताधारक लेखापरीक्षकांची नामतालिका तयार केलेली आहे. सदरहु नामतालिकेचा कालावधी सन २०१८-१९ मध्ये संपुष्टात येत असल्याने पुढील कालावधीसाठीची नामतालिका तयार करणे आवश्यक झालेले आहे.

५/- परिव्यय लेखापरीक्षण (कॉस्ट ऑडिट) व उर्जा लेखापरीक्षण (एनर्जी ऑडिट) यासाठी नव्याने तयार करणेत येणाऱ्या नामतालिकेचा कालावधी ५ वर्षांसाठी निश्चित करणेत येत आहे. त्याप्रमाणे सदरची नामतालिका सन २०१९-२० ते २०२३-२४ या ५ आर्थिक वर्षांसाठी कायम राहील. तथापि नव्याने

अर्हता धारण करणाऱ्या परिव्यय लेखापालांना व उर्जा लेखापरीक्षकांना पुढील ५ वर्षांच्या कालावधीमध्ये नामतालिकेवर यावयाचे झाल्यास अशा लेखापरीक्षकांनी प्रतीवर्षी माहे जानेवारी ते मार्च या कालावधीमध्ये परिपत्रकासोबत निर्धारित करून दिलेल्या अवेदन नमुन्यामध्ये अर्ज करावयाचा आहे. पात्र अर्जदार अशा रितीने प्रतिवर्षी माहे एप्रिल मध्ये ज्या-त्या नामतालिकेमध्ये पुरवणी यादीद्वारे नोंदणीकृत केले जातील. तथापि पुढील ५ वर्षांसाठी विषद रितीने तयार केलेल्या नामतालिकेचा कालावधी माहे मार्च २०२४ रोजी संपुष्टात येईल. त्यावेळी सर्वच अर्हताधारक लेखापरीक्षकांनी नव्याने अर्ज करणे अनिवार्य राहील.

**अ) सन २०१९-२० ते सन २०२३-२४ या कालावधीसाठी परिव्यय लेखापालांना (कॉस्ट अकाऊटंट) नामतालिकेवर नोंदणीकृत होणेसाठीचे अर्हता निकष पुढील प्रमाणे आहेत -**

१) परिव्यय आणि कार्य लेखापाल अधिनियम, १९५९ च्या कलम ३ खाली स्थापन करण्यात आलेल्या भारतीय परिव्यय आणि कार्य लेखापाल संस्थेचे (ICAI) अर्जदार परिव्यय लेखापाल सदस्य असले पाहिजेत.

२) ICAI ने दिलेले सर्टीफीकेट ऑफ प्रॅक्टीस (COP) असणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे फर्मसाठी / वैयक्तीक परिव्यय लेखापालासाठी सद्यस्थितीतील constitution certificate असणे आवश्यक आहे.

३) परिव्यय लेखापाल / परिव्यय लेखापाल फर्मस यांना परिव्यय लेखापरीक्षणाचा किमान तीन वर्षांचा अनुभव आवश्यक आहे. त्यांनी किमान ३ कॉस्ट ऑडिट्स केलेली असावीत.(कोणताही प्रक्रीया उद्योग)

४) परिव्यय लेखापाल यांनी फर्मव्दारे किंवा वैयक्तीकरित्या यापैकी कोणत्याही एकाच कक्षेत अर्ज करणे बंधनकारक आहे.

५) परिव्यय लेखापालांच्या भागीदारी फर्मस / वैयक्तीक परिव्यय लेखापाल यांची नोंदणीकृत कार्यालये महाराष्ट्रात असणे आवश्यक आहे. तसेच कॉस्ट अकाऊटंट यांना मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक राहील.

६) परिव्यय लेखापालांच्या फर्मस / वैयक्तीक परिव्यय लेखापाल यांना परिव्यय लेखापरीक्षण करण्यापासून अपात्र न ठरविले बाबतचे, वैयक्तीक/ फर्मस यापैकी एकाच कक्षेने नामतालिकेसाठी अर्ज केला असल्याची बाब अशा दोनही निकषांमध्ये पात्र ठरणेसाठी अन्य निकषांसोबत सत्यापनार्थ अवेदन पत्रामध्ये स्वाक्षरी करावयाची आहे.

७) अर्जदार फर्म / वैयक्तीक परिव्य लेखापाल यांनी नामतालिकेवर नोंदणीकृत होणेसाठीचे नोंदणी शुल्क रू. १,०००/- (रूपये एकहजार मात्र) इतके निश्चित केले आहे. उक्त रक्कम पुढील बँक खात्यामध्ये आर.टी.जी.एस. / एन.इ.एफ.टी. / रोखीने भरणा करावेत. भरणा रकमेचा पुरावा अर्जासोबत या कार्यालयास सादर करावा.

१. बँकेचे नाव - पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. पुणे (PUNE DISTRICT CENTRAL CO-OP. BANK LTD. PUNE)
२. शाखेचे नाव - कृषि महाविद्यालय शाखा.
३. खाते क्रमांक - ०३४००१६०००००२५४
४. IFSC CODE - HDFCOCPDCCB
५. खाते धारकाचे नाव - साखर आयुक्त महाराष्ट्र राज्य, पुणे (SAKHAR AYUKTA MAHARASHTRA RAJYA PUNE)

**<u>ब) सन २०१९-२० ते सन २०२३-२४ या कालावधीसाठी उर्जा लेखापरीक्षकांना (एनर्जी ऑडिटर) नामतालिकेवर नोंदणीकृत होणेसाठीचे अर्हता निकष पुढील प्रमाणे आहेत -</u>**

१) उर्जा लेखापरीक्षक फर्म मध्ये किमान एक BEE (Bureau of Energy Efficiency) प्रमाणित उर्जा लेखापरीक्षक असणे आवश्यक त्याच प्रमाणे वैयक्तीकरित्या अर्ज करावयाचा झाल्यास अर्जदार स्वत: BEE (Bureau of Energy Efficiency) प्रमाणित उर्जा लेखापरीक्षक असणे आवश्यक आहे.

२) भागीदारी फर्मचे तसेच वैयक्तीक उर्जा लेखापरीक्षक यांचे नोंदणीकृत कार्यालय महाराष्ट्रात असणे आवश्यक आहे. तसेच संबंधीतास मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे बंधनकारक आहे.

३) अर्जदार उर्जा लेखापरीक्षकास / उर्जा लेखापरीक्षक फर्मस यांना उर्जा लेखापरीक्षण क्षेत्रातील किमान तीन वर्षांचा अनुभव आवश्यक आहे.

४) अर्जदार फर्म / वैयक्तीक उर्जा लेखापरीक्षक यांनी किमान तीन उर्जा लेखापरीक्षणे केलेली असावी. (कोणताही प्रक्रीया उद्योग)

५) भागीदारी फर्मसचे तसेच वैयक्तीक उर्जा लेखापरीक्षक यांचेकडे उर्जा लेखापरीक्षण साधने व उपकरणे असणे आवश्यक. त्याची यादी, खरेदी बिले, कॅलीब्रेशन प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावीत.

६) उर्जा लेखापरीक्षक यांनी फर्मव्दारे किंवा वैयक्तीकरित्या यापैकी कोणत्याही एकाच कक्षेत अर्ज करणे आवश्यक आहे.

७) उर्जा लेखापरीक्षकांच्या फर्मस / वैयक्तीक उर्जा लेखापरीक्षक यांना उर्जा लेखापरीक्षण करण्यापासून अपात्र न ठरविले बाबतचे,वैयक्तीक/ फर्मस यापैकी एकाच कक्षेने नामतालिकेसाठी अर्ज केला असल्याची बाब अशा दोनही निकषांमध्ये पात्र ठरणेसाठी अन्य निकषांसोबत सत्यापनार्थ अवेदन पत्रामध्ये स्वाक्षरी करावयाची आहे.

८) अर्जदार फर्म / वैयक्तीक परिव्य लेखापाल यांनी नामतालिकेवर नोंदणीकृत होणेसाठीचे नोंदणी शुल्क रू. १,०००/- (रूपये एकहजार मात्र) इतके निश्चित केले आहे. उक्त रक्कम पुढील बँक खात्यामध्ये आर.टी.जी.एस. / एन.इ.एफ.टी. / रोखीने भरणा करावेत. भरणा रकमेचा पुरावा अर्जासोबत या कार्यालयास सादर करावा.

  १) बँकेचे नाव - पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. पुणे (PUNE DISTRICT CENTRAL CO-OP. BANK LTD. PUNE)
  २) शाखेचे नाव - कृषि महाविद्यालय शाखा.
  ३) खाते क्रमांक - ०३४००१६०००००२५४
  ४) IFSC CODE - HDFCOCPDCCB
  ५) खाते धारकाचे नाव - साखर आयुक्त महाराष्ट्र राज्य, पुणे (SAKHAR AYUKTA MAHARASHTRA RAJYA PUNE)

**वरील निर्धारीत करण्यात आलेल्या निकषाप्रमाणे नामतालिका तयार करण्यासाठीचा कालबध्द कार्यक्रम पुढील प्रमाणे आहे.**

१) नामतालिकेवर येण्यासाठी अर्ज करण्याची मुदत दिनांक १५ फेब्रुवारी २०१९ ते ०८ मार्च २०१९ अशी राहील.

२) प्राप्त अर्जांचा छाननी कालावधी दिनांक ०९ मार्च २०१९ ते २५ मार्च २०१९ इतका आहे.

३) माहे एप्रिल २०१९ मध्ये परिव्यय लेखापरीक्षक व उर्जा लेखापरीक्षक यांची नामतालिका घोषीत करणेत येईल.